# निवडणुकीत पकडली अकरा लाखांची दारू

म. टा. प्रतिनिधी, नगर




अहमदनगर व शिर्डी लोकसभा मतदारसंघासाठी निवडणूक जाहीर झाल्यानंतर आचारसंहितेच्या काळात अवैध मद्यविक्री, दारू वाहतुकीवर कारवाई करण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने पथक स्थापन केले आहे. निवडणुकीच्या काळात ११२ गुन्हे नोंदवून राज्य उत्पादन शुल्क विभागाने ११ लाख ३२ हजार रुपयांची दारू जप्त केली आहे.

निवडणुकीच्या काळात अवैध दारू पकडण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने विशेष भरारी पथकांची स्थापन केली आहे. भरारी पथकाने नगर शहर, ग्रामीण भागात अकोले या ठिकाणी मोठ्या कारवाया करत लाखो रुपयांची दारू व वाहने जप्त केली आहेत. निवडणुकीच्या काळात जिल्ह्यात ११२ गुन्हे नोंदविण्यात येऊन ९४ जणांना अटक करण्यात आली. या कारवाईत हातभट्टीचे ९९० लिटर कच्चे रसायन, साडेपाच हजार लिटर देशी दारू, ४७२ लिटर देशी दारू, साडेतीनशे लिटर ताडी, सात वाहने जप्त केली. एकूण ११ लाख ३२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नगर शहरातील बोल्हेगाव भागात गेल्या आठवड्यात दोन लाख रुपयांची दारू जप्त करण्यात आली. गोवा राज्यात निर्मित होणारी दारू कर चुकवून विक्रीसाठी आणण्यात आली होती, तर राज्य उत्पादन शुल्कच्या संगमनेर विभागाच्या पथकाने अकोले बायपास येथे एका चारचाकी गाडीतून एक लाख १९ हजार रुपयांची दारू जप्त केली आहे. याचबरोबर महामार्गांवरील धाब्यांची तपासणी करण्यात येणार आहे. तपासणीत गैरप्रकार आढळल्यास कडक कारवाई केली जाणार आहे. देशी-विदेशी दारूच्या दुकानांची तपासणी करण्यात आली आहे. तीन दारू दुकानांच्या दारू विक्रीत तफावत आढळल्याने त्यांच्याविरुद्ध कारवाई केली जाणार आहे. अवैध दारू पकडण्यासाठी रात्रीची गस्त वाढविण्यात येणार आहे. रात्री संशयित वाहनांची कसून चौकशी करण्यात येईल, अशी माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक पराग नवलकर यांनी दिली.

लोकमत

# पहिल्याच दिवशी २१ जणांनी नेले ३९ उमेदवारी अर्ज

## लोकसभा निवडणूक : अर्जांमध्ये प्रमुख उमेदवारांचा समावेश नाही

लोकमत न्यूज नेटवर्क

**अहमदनगर :** अहमदनगर लोकसभा मतदारसंघासाठीची अधिसूचना गुरुवारी जारी करण्यात आली असून पहिल्याच दिवशी एकूण २१ जणांनी ३९ अर्ज नेले. मात्र यात प्रमुख उमेदवारांचा समावेश नाही. पहिल्या दिवशी अर्जही कोणी दाखल केला नाही.

गुरुवारपासून अहमदनगर मतदारसंघासाठी अधिसूचना आज जारी झाल्यानंतर नामनिर्देशन प्रक्रिया सुरु झाली. या लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी राहुल द्विवेदी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी अजय मोरे यांनी निवडणूक यंत्रणेचे १७ अधिकारी-कर्मचारी या प्रक्रियेसाठी नियुक्त केले आहेत.गुरुवारी पहिल्याच दिवशी २१ जणांनी एकूण ३९ अर्ज नेले. उमेदवारी अर्ज मोफत असून अर्ज भरतेवेळी अनामत रक्कम (खुला- २५ हजार, आरक्षित १२५०० रुपये) भरावी लागते. सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत अर्ज स्वीकारले जात आहेत. अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक ४ एप्रिल (गुरुवार) असून छाननी ५ एप्रिल रोजी होईल. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ८ एप्रिल आहे. अर्ज भरताना उमेदवारांसह केवळ ४ जणांनाच दालनात येता येईल.

गुरुवारी पहिल्याच दिवशी अर्ज

दिवशी प्रमुख पक्षांच्या कोणत्याच उमेदवारांनी अर्ज नेले नाहीत. वंचित आघाडीचे उमेदवार सुधाकर आव्हाड, संजीव भोर, सबाजी गायकवाड , नामदेव वाकळे, साईनाथ घोरपडे

### ११ ते ३ रस्ते बंद

- **अर्ज भरण्याच्या ठिकाणी पुरेसा बंदोबस्त ठेवण्यात आला असून या ठिकाणापासून १०० मीटर परिसरात कलम १४४ नुसार प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहेत. त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातून जाणारे रस्ते ११ ते ३ या वेळेत रोज बंद राहणार आहेत. याशिवाय तीनपेक्षा जास्त वाहने आणि ४ पेक्षा जास्त व्यक्तींना घेऊन नामनिर्देशन ठिकाणामध्ये प्रवेश करण्यास प्रतिबंध करण्यात आल्याचे निवडणूक यंत्रणेने स्पष्ट केले आहे.**

# ‘दक्षिणे’साठी पहिल्याच दिवशी २१ जणांनी नेले ३९ अर्ज

**नगर, दि. २८ (प्रतिनिधी) -** दक्षिण नगर लोकसभा मतदारसंघासाठीची अधिसूचना आज जारी होताच पहिल्याच दिवशी २१ जणांनी ३९ अर्ज नेल्याची माहिती निवडणूक यंत्रणेने दिली. नामनिर्देशन प्रक्रिया सुरू झाली आहे. अर्ज नेणाऱ्यांमध्ये काही राजकीय पक्षाचे उमेदवार, पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्त्यांचा समावेश आहे.

चंद्रकांत रेणावीकर (सावेडी, दोन अर्ज ठिकाण आणि अर्जाची संख्या कंसात आहे), श्रीधर दरेकर (नगर, दोन अर्ज), कलीराम पोपळघट (संगमनेर, तीन अर्ज), ज्ञानदेव पाडळे (देवगांव, ता. नेवासा चार अर्ज), बहुजन समाजवादी पक्षाचे ॲड.

## चार एप्रिलपर्यंत नामनिर्देशन भरता येणार

नामदेव वाळके (सावेडी, नगर, चार अर्ज), सुधाकर आव्हाड (मजले चिंचोली, नगर, चार अर्ज), साईनाथ घोरपडे (रा. वैजुबाभुळगाव, ता. पाथर्डी एक अर्ज), सुरेश रासकर (रा. वाडेगव्हाण, ता. पारनेर, एक अर्ज), दत्तात्रय वाघमोडे (रा. शिराढोण, नगर, एक अर्ज), विलास लाकुडझोडे (रा. श्रीगोंदा, दोन अर्ज), सुनील देठे (रा. शेंडी, ता. नगर, एक अर्ज), भास्कर पाटोळे (रा. नगर, एक अर्ज), भागवत धोंडिबा (रा. कवठे कमळेश्वर, ता. संगमनेर, एक अर्ज) नेले.

संदीप संसारे यांनी शिवप्रहारचे संजीव भोर यांच्यासाठी (रा. गुलमोहोर रोड, सावेडी) यांच्यासाठी दोन अर्ज नेले आहेत. नीलेश गाडेकर यांनी राष्ट्रवादीचे नेते सबाजीराव गायकवाड (रा. पारनेर) यांच्यासाठी दोन अर्ज नेले, रियाजोद्दिन शेख (रा. झेंडिगेट, दोन अर्ज), विजय पवार (रा. पाडळी, ता. जामखेड, एक अर्ज), शांताराम बनसोडे (रा. साकुरी, ता. राहाता, एक अर्ज), अनिल ठवाळ (रा. आढळगाव, ता. श्रीगोंदे, एक अर्ज), सुनील राऊत (रा. घुलेवाडी, ता. संगमनेर, दोन अर्ज), प्रकाश लोंढे (रा. गोविंदपुरा, नगर, एक अर्ज) यांनी अर्ज नेले आहेत. नामनिर्देशनपत्र स्वीकारण्यासाठी जिल्हाधिकारी यांचे नियोजन भवनातील दालन निश्चित करण्यात आले आहे. निवडणूक कक्षात मदतीसाठी १७ अधिकारी-कर्मचारी कार्यरत आहे. सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत नामनिर्देशनपत्र स्वीकारले जाणार आहेत. नामनिर्देशन भरण्याचा अंतिम दिनांक ४ एप्रिल असणार आहे. उमेदवारांना ऑनलाईन आणि ऑफलाईन अशा दोन्ही पर्यायांपैकी कोणत्याही पर्यायाचा वापर करून अर्ज भरता येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. नामनिर्देशनपत्र भरण्याच्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त आहे. उमेदवारांच्या सुविधेसाठी नामनिर्देशन स्वीकारण्याच्या ठिकाणी उमेदवार सहायता कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

## एकही अर्ज दाखल नाही

नगर दक्षिणसाठी २१ जणांनी ३९ अर्ज नेले असले, तरी एकानेही अर्ज भरलेला नाही. जिल्हाधिकारी कार्यालयात अर्ज नेण्यासाठी गर्दी होती. बसपचे ॲड. नामदेव वाकळे, राष्ट्रवादीचे सबाजीराव गायकवाड आणि शिवप्रहारचे संजीव भोर या राजकीय पदाधिकाऱ्यांनी अर्ज नेले आहेत.

# शेवगावात निवडणूक कर्मचाऱ्यांची कार्यशाळा



**शेवगाव, दि.२८ (प्रतिनिधी)** - येत्या २३ एप्रिलला होणाऱ्या लोकसभा निवडणुकीसाठी शेवगाव विधानसभा मतदार संघातील मतदान केंद्रावर नियुक्त करण्यात येणाऱ्या केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी व जवळपास अडीच हजारावर सहाय्यक कर्मचाऱ्याची आज येथील पाथर्डी रस्त्यावरील साई लॉन्स मध्ये प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली.

यावेळी प्रांताधिकारी तथा अहमदनगर लोकसभा मतदार संघाचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी देवदत्त केकाण, शेवगावचे तहसीलदा डॉ. विनोद भामरे, पाथर्डीचे तहसीलदार नामदेव पाटील यांनी सर्व उपास्थितांना मतदान प्रक्रियेतील सर्व बार्बीबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. मतदान यंत्राची व व्हीव्हीपॅट मशीनची कार्यपध्दती दाखविली. प्रशिक्षणासाठी सुमारे अडीच हजारावर कर्मचारी व अधिकारी उपस्थित होते

दोन एईल्डी प्रोजेक्टरच्या साह्याने हे प्रशिक्षण देण्यात आले. नायब तहसीलदार भानुदास गुंजाळ, मयूर बेरड, माधव गायकवाड, गणेश हुलमुखे उपस्थित होते . दोन्ही तालुक्यांतील कर्मचाऱ्यांसाठी प्रथमच एकत्रित प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित केले होते. त्यामुळे उपस्थितांच्या वाहनांमुळे शेवगाव- नगररस्त्यावरील वाहतूक विस्कळीत झाली होती.

प्रभात Fri, 29 March 2019
epaper.eprabhat.net/c/38026586

**रणधुमाळी** • प्रक्रियेसाठी १७ अधिकारी-कर्मचारी नियुक्त, जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात जमावबंदी

# पहिल्याच दिवशी २१ जणांनी नेले ३९ अर्ज

प्रतिनिधी | नगर

अहमदनगर लोकसभा मतदारसंघासाठीची अधिसूचना गुरुवारी जारी करण्यात आली. त्यानंतर पहिल्याच दिवशी एकूण २१ जणांनी ३९ उमेदवारी अर्ज नेले, अशी माहिती सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा भूसंपादनचे उपजिल्हाधिकारी अजय मोरे यांनी दिली. या प्रक्रियेसाठी निवडणूक निर्णय अधिकारी राहुल द्विवेदी व सहायक निवडणूक अधिकारी अजय मोरे यांनी निवडणूक यंत्रणेचे १७ अधिकारी-कर्मचारी नियुक्त केले आहेत. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयात पोलिस बंदोबस्त तैनात केला आहे.

गुरुवारी पहिल्याच दिवशी २१ जणांनी एकूण ३९ उमेदवारी अर्ज नेले. चंद्रकांत दामोधर रेपाळीकर (सावेडी, अहमदनगर) यांनी स्वतःसाठी दोन, श्रीधर जाखुजी दरेकर (नगर) यांनी स्वतःसाठी दोन, पोपळघट कलिराम बहिरू (संगमनेर) यांनी स्वतःसाठी तीन, ज्ञानदेव कारभारी पाडळे (देवगाव, नेवासे) यांनी स्वतःसाठी चार, नामदेव अर्जुन वाळके (सावेडी) यांनी चार, सुधाकर लक्ष्मण आव्हाड (मजले चिंचोली, नगर) यांनी चार, साईनाथ भाऊसाहेब घोरपडे (वैजुबाभुळगाव, पाथर्डी) यांनी एक अर्ज नेला.

सुरेश मारोड रासकर (वाडेगव्हाण, पारनेर) यांनी एक, दत्तात्रय अप्पा वाघमोडे (शिराढोण, नगर) यांनी एक, विलास साळजी लाकुडझोडे (श्रीगोंदे) यांनी दोन, सुनील एकनाथ देठे (शेंडी) यांनी एक, भास्कर फकिरा पाटोळे (नगर) यांनी एक, भागवत धोंडिबा गायकवाड (संगमनेर) यांनी एक, संदीप तुकाराम संसारे (पाइपलाइन रोड, सावेडी) यांनी संजीव बबन भोर यांच्यासाठी दोन, नीलेश दत्तात्रय गाडेकर (सावेडी) यांनी सबाजीराव महादू गायकवाड (पारनेर) यांच्यासाठी दोन अर्ज नेले.

रिकाजोद्दिन फजलोद्दिन शेख (झेंडिगेट) यांनी दोन, विजय सोपान पवार (पाडळी, ता. जामखेड) यांनी एक, शांताराम ओंकार सनसोडे (साकुरी, राहाता) यांनी एक, अनिल भगवान टवाळ (आढळगाव, श्रीगोंदे) यांनी एक, सुनील गंगाधर राऊत (घुलेवाडी, संगमनेर) यांनी दोन, प्रकाश अण्णासाहेब लोंढे (गोविंदपुरा, नगर) यांनी एक अर्ज नेला. नामनिर्देशनपत्र (उमेदवारी अर्ज) जिल्हाधिकारी कार्यालयातच स्वीकारले जाणार आहेत.

निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी द्विवेदी यांच्या साहाय्यासाठी भूसंपादनचे उपजिल्हाधिकारी अजय मोरे यांची नियुक्ती केली आहे. त्यांच्या मदतीला १७ अधिकारी कर्मचारी दिलेले आहेत. सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत नामनिर्देशनपत्र स्वीकारले जातील. उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिनांक ४ एप्रिल (गुरुवार) आहे. ५ एप्रिल रोजी अर्जांची छाननी होईल. अर्ज माघारीचा अंतिम दिवस ८ एप्रिल आहे.

### सहायक कक्षाची मदत

उमेदवारांच्या सुविधेसाठी नामनिर्देशन स्वीकारण्याच्या ठिकाणी उमेदवार सहायता कक्ष स्थापन केला आहे. नामनिर्देशन पत्र वाटप, अनामत स्वीकृती, नामनिर्देशन पत्राची छाननी आणि उमेदवारांना आवश्यक ते माहिती साहित्य वाटप करण्याचे कामकाज या कक्षाच्या माध्यमातून केले जाणार आहे. गुरुवारी पहिल्याच दिवशी अर्ज नेण्यासाठी आलेल्यांना या कक्षातून परिपूर्ण माहिती दिली जात होती.



उमेदवारांच्या सुविधेसाठी अर्ज स्वीकारण्याच्या ठिकाणी उमेदवार सहायता कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

### मोबाइल वापराला बंदी

उमेदवारी भरताना उमेदवारासह केवळ ४ जणांनाच दालनात प्रवेश आहे. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचे कक्षात मोबाइल वापरण्यास मनाई केलेली आहे. नुकत्याच पार पडलेल्या अहमदनगर महापालिका निवडणुकीच्या वेळीही प्रशासनाने हीच खबरदारी घेतली होती. उमेदवारांना ऑनलाइन आणि ऑफलाइन अशा दोन्ही पर्यायांपैकी कोणत्याही पर्यायाचा वापर करून अर्ज भरता येईल.

### जमावबंदीमुळे शुकशुकाट

उमेदवारी अर्ज भरण्याच्या ठिकाणी पुरेसा बंदोबस्त ठेवलेला आहे. या ठिकाणापासून १०० मीटर परिसरात जमावबंदीचे आदेश जारी करण्यात आले आहेत. तीनपेक्षा जास्त वाहने आणि ४ पेक्षा जास्त व्यक्तींना घेऊन नामनिर्देशन ठिकाणामध्ये प्रवेश करण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडे येणारे सर्व रस्ते बंद केल्यामुळे गुरुवारी या परिसरात शुकशुकाट होता.